RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार

वर्ष १२, अंक ४] मंगळवार, मार्च १०, २०२६/फाल्गुन १९, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

असाधारण क्रमांक ४

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

सन २०२६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २.— महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत अधिनियम, २०२५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. ..	**पृष्ठे** १-३

दिनांक ९ मार्च २०२६ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

सतिश वाघोले,
सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

सन २०२६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक १० मार्च २०२६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत अधिनियम, २०२५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

२०२५ चा महा. १७.

ज्याअर्थी, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत अधिनियम, २०२५ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे.

त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सत्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :-

संक्षिप्त नाव.

१. या अधिनियमास, महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २०२६, असे म्हणावे.

सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम १० ची सुधारणा.

२. महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत अधिनियम,२०२५ (यात यापुढे, ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम १० मध्ये, तक्त्यातील, स्तंभ (४) मधील, "३१ डिसेंबर २०२५" या मजकुराऐवजी "३१ मार्च २०२६", हा मजकूर दाखल करण्यात येईल. २०२५ चा महा. १७.

सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम ११ ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम ११ मध्ये, पोट-कलम (१) नंतर, पुढील परंतुके जादा दाखल करण्यात येतील :—

" परंतु, जेव्हा एकाच वैधानिक आदेशाच्या बाबतीत एकापेक्षा अधिक अपिले दाखल केले असतील आणि अशा अपिलांमध्ये विभिन्न व विलग करता येण्याजोगे विवाद मुद्दे अंतर्भूत असतील त्या बाबतीत, अर्जदारास, या अधिनियमाअन्वये लाभ मिळविण्याच्या प्रयोजनासाठी, अशा विभिन्न व विलग करता येण्यायोग्य विवाद मुद्यांशी संबंधित असणारे अपील, उर्वरित अपिलाच्या किंवा अपिलांच्या सातत्यतेवर परिणाम न करता, पूर्णपणे व विनाशर्त मागे घेता येईल :

परंतु, आणखी असे की, जेव्हा या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यापूर्वी, वैधानिक आदेशाच्या बाबतीत, मग तो अपिलातील असो किंवा अन्यथा असो,- कोणत्याही आवश्यक रकमेचे प्रदान करण्यात आले असेल आणि,—

(क) जेव्हा, असे प्रदान, विवाद मुद्दे-निहाय ओळखण्यायोग्य असेल तर, ते संबंधित विवाद मुद्याशी किंवा मुद्यांशी संबंधित असणाऱ्या दायित्वापोटी समायोजित करण्यात येईल;

(ख) जेव्हा, असे प्रदान, विवाद मुद्दे-निहाय ओळखण्यायोग्य नसेल तर, ते, पदनिर्देशित अधिकारी निर्धारित करील अशा रीतीने, या कलमाअन्वये मागे घेतलेल्या अपिलामधून किंवा अपिलांमधून आणि ज्या प्रलंबित राहिलेल्या आहेत अशा अपिलामधून किंवा अपिलांमधून उद्‌भवणाऱ्या दायित्वाच्या पोटी, प्रमाणशीरपणे समायोजित करण्यात येईल.".

विधिग्राह्यीकरण.

४. महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत अधिनियम, २०२५ (यात यापुढे ज्याचा निर्देश, " उक्त अधिनियम " असा केला आहे) यात अथवा कोणत्याही न्यायालयाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा आदेश यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ३१ डिसेंबर २०२५ नंतर, महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २०२६ याच्या प्रारंभाच्या दिनांकापर्यंत, कोणत्याही अर्जदाराकडून उक्त अधिनियमान्वये प्रदान केलेल्या किंवा गोळा केलेल्या उक्त अधिनियमान्वये व्याख्या केल्याप्रमाणे संबद्ध अधिनियमान्वये कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या आवश्यक रकमेचे कोणतेही प्रदान हे, या अधिनियमाद्वारे सुधारणा केल्याप्रमाणे उक्त अधिनियमाच्या तरतुदी, जणू काही सर्व महत्त्वाच्या वेळी सतत अंमलात होत्या असे समजून, कायद्यानुसार यथोचितरीत्या व वैधरीत्या प्रदान करण्यात व गोळा करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल आणि नेहमीकरिता प्रदान करण्यात व गोळा करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार,— २०२५ चा महा. १७. २०२६ चा महा.२.

(क) आवश्यक रकमेच्या मार्गाने मिळालेल्या किंवा प्राप्त झालेल्या कोणत्याही रकमेच्या परताव्यासाठी कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही प्राधिकरणात अथवा कोणत्याही न्यायालयासमोर किंवा कोणत्याही प्राधिकरणासमोर कोणताही दावा किंवा कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही किंवा चालू ठेवण्यात येणार नाही ;

(ख) कोणतेही न्यायालय किंवा इतर कोणतेही प्राधिकरण, अशा आवश्यक रकमेच्या मार्गाने मिळालेल्या किंवा प्राप्त झालेल्या कोणत्याही रकमेच्या परताव्याचा निदेश देणारा कोणताही हुकूमनामा किंवा आदेश, बजावणार नाही.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.